# थोडक्यात महत्त्वाचे



कुंडल : येथील क्रांतिअग्रणी डा.जी.डी.बापू लाड महाविद्यालयामध्ये वाचन संकल्प राबविण्यात आला.

## क्रांतिअग्रणी महाविद्यालयामध्ये वाचन संकल्प उपक्रम

**केसरी वृत्तसेवा**

कुंडल : येथील क्रांतिअग्रणी डा.जी.डी.बापू लाड महाविद्यालयामध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले. ग्रंथप्रदर्शन, सामुहिक वाचन, दुर्मिळ ग्रंथप्रदर्शन, वाचन कौशल्य कार्यशाळा व पुस्तक परीक्षण आदी कार्यक्रमांचे आयोजन केले होते. वाचन कौशल्य कार्यशाळा व स्थानिक लेखक परीसंवाद व नवसाहित्याची ओळख याअंतर्गत मान्यवर लेखकांचे व्याख्यान आयोजित केले होते, तर ग्रंथालयामध्ये दुर्मिळ व महत्वपूर्ण ग्रंथांचे प्रदर्शनही आयोजित केले होते.. या उपक्रमाचे संयोजन प्राचार्य डा.आर.एस. डुबल यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथपाल किशोर देसाई यांच्यासह ग्रंथालय समितीने केले.

दै. केसरी दि. 21/01/2025

# गावाच्या स्वच्छतेबरोबरच मनहीस्वच्छ होणे गरजेचे

## किरण लाड

**केसरी वृत्तसेवा**

**कुंडल :** गावातील नाले, रस्ते साफ करण्याबरोबरच मानसांची मन स्वच्छ करण्याचे काम करणेही गरजेचे असल्याचे मत क्रांती दुध संघाचे चेअरमन किरण लाड यांनी व्यक्त केले.

सांडगेवाडी (ता. पलूस) येथे क्रांतीअग्रणी डॉ.जी. डी. बापू लाड महाविद्यालये आयोजित राष्ट्रीय सेवा योजन विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते . ते म्हणाले, लोकांनी स्वतःची स्वच्छता स्वतः करण्याची सवय कमी झाली असून ती सवय परत लागावी यासाठी अशी श्रमसंस्कार शिबिरे गरजेचे आहे. तंटामुक्ती अध्यक्ष शशिकांत सांडगे म्हणाले आमच्या गावाला स्वच्छतेचे पुरस्कार मिळाले आहेत. यामध्ये आपल्या महाविद्यालयाचा वाटा आहे. आपल्या महाविद्यालयाचे श्रमसंस्कार शिबिर आमच्या गावात होत असून ग्रामपंचायत सर्व सहकार्य करेल. सरपंच अमर वडार म्हणाले, माझी वसुंधरा अभियानामध्ये सांडगेवाडीचा नंबर आला आहे. यासाठी आपल्या महाविद्यालयाचे मोठे सहकार्य आहे.

स्वागत प्राचार्य डॉ. आर. एस. डूबल यांनी केले. सरपंच अमर वडार, उपसरपंच शोभाताई सांडगे, शरद शिंदे, सुनिल सुर्यवंशी सर्व ग्रामपंचायत सदस्य, प्राचार्य, प्राध्यापक, ग्रामस्थ उपस्थित होते. आभार डॉ. डी. एम. होनमाने यांनी मानले.

दै. केसरी दि. 29/01/2025

Signature:

दक्षिण महाराष्ट्र
केसरी

# लोकशाही टिकविण्यासाठी १०० टक्के मतदानाची गरज

## राजीव शिंदे

केसरी वृत्तसेवा

**कुंडल :** लोकशाही टिकविण्याची जबाबदारी देशातील नागरीकांची असल्याने नागरीकांनी शंभर टक्के मतदान केले पाहिजे व युवकांनी मतदार म्हणून नाव नोंद केले पाहिजे. कारण देशाचे भवितव्य घडविण्याची जबाबदारी युवा पिढीच्या हातात असून सर्व युवा पिढीने जागरुक राहुन मतदार यादीमध्ये नाव नोंद करुन प्रत्येक निवडणूकीवेळी मतदान करणे गरजेचे असल्याचे उपजिल्हाधिकारी राजीव शिंदे यांनी केले.



**कुंडल : जनजागृती रॅलीची सुरुवात करताना उपजिल्हाधिकारी राजीव शिंदे. नायब तहसीलदार आस्मा मुजावर, स्वाती पवार.**

कुंडल येथे तहसील कार्यालय पलूस व क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला यावेळी ते बोलत होते. यावेळी निवासी. नायब तहसीलदार आस्मा मुजावर, मंडल अधिकारी स्वाती पवार उपस्थित होते.

यावेळी वक्तृत्व, निबंध, पोष्टर व रांगोळी स्पर्धा आयोजित केल्या होत्या. किरण लाड म्हणाले, हा देश स्वातंत्र करण्यासाठी हजारो स्वातंत्रसैनिकांनी आपले बलिदान दिले, या बलिदानातून मिळालेले हे स्वातंत्र व लोकशाही टिकविण्याची जबाबदारी भारतातील प्रत्येक नागरीकाची आहे. मतदार जनजागृती रलीने या अभियानाची सांगता झाली.

दै केसरी दि. 30/09/2024

Dr.G... Krantiagrani ...vidyalaya, Kundal Tal.Palus Dist.Sangli

महासत्ता
कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

# लोकशाही टिकविण्यासाठी मतदान करण्याची गरज

## -राजीव शिंदे

कुंडल,ता.२९(वार्ताहर)-

लोकशाही टिकविण्याची जबाबदारी देशातील नागरिकांची असल्याने नागरिकांनी मतदान केले पाहिजे व युवकांनी मतदार म्हणून नाव नोंद केले पाहिजे. कारण देशाचे भवितव्य घडविण्याची जबाबदारी युवा पिढीच्या हातात असून सर्व युवा पिढीने जागरुक राहुन मतदार यादीमध्ये नाव नोंद करुन प्रत्येक निवडणूकीवेळी मतदान करणे गरजेचे असल्याचे उपजिल्हाधिकारी राजीव शिंदे यांनी केले.

कुंडल येथे तहसिल कार्यालय पलूस व क्रांतिअग्रणी डॉ.जी. डी. बापू लाड महाविद्यालय यांचे संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी निवासी नायब तहसिलदार आस्मा मुजावर, मंडल अधिकारी स्वाती पवार आदी मान्यवर उपस्थित होते

यावेळी वक्तृत्व, निबंध, पोष्टर व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते झाले. किरण लाड म्हणाले, हा देश स्वातंत्र करण्यासाठी हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी आपले बलिदान दिले, अन् हजारो लोकांच्या बलिदानातून मिळालेले हे स्वातंत्र्य व लोकशाही टिकविण्याची जबाबदारी भारतातील प्रत्येक नागरिकाची असून युवा पिढीसह सर्व नागरिकांनी मतदान करणे गरजेचे आहे. शेवटी मतदार जनजागृती रॅलीने या अभियानाची सांगता झाली. या कार्यक्रमाचे संयोजन क्रांतीअग्रणी महाविद्यालय व पलुस तहसिल कार्यालयाच्या वतीने करण्यात आले.



राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमामध्ये जनजागृती रॅलीची सुरुवात करताना उपजिल्हाधिकारी राजीव शिंदे.

Daily Mhasatta

दैनिक महासत्ता

Dr.G.D.Bapu Lad Mahavidyalaya, Kundal
Tal.Palus Dist.Sangli

दैनिक ललकार

# लोकशाही टिकविण्यासाठी मतदान करण्याची गरज

## राजीव शिंदे

। ललकार वृत्त ।

कुंडल दि. २९ (वार्ताहर) - लोकशाही टिकविण्याची जबाबदारी देशातील नागरीकांची असल्याने नागरीकांनी मतदान केले पाहिजे व युवकांनी मतदार म्हणून नाव नोंद केले पाहिजे.कारण देशाचे भवितव्य घडविण्याची जबाबदारी युवा पिढीच्या हातात असून सर्व युवा पिढीने जागरुक राहुन मतदार यादीमध्ये नाव नोंद करून प्रत्येक निवडणूकीवेळी मतदान करणे गरजेचे असल्याचे उपजिल्हाधिकारी राजीव शिंदे यांनी केले,ते कुंडल येथे तहसिल कार्यालय पलूस व क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालय यांचे संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मतदार दिन साजरा करणेत आला यावेळी ते बोलत होते यावेळी निवासी नायब तहसिलदार आस्मा मुजावर,मंडल अधिकारी स्वाती पवार आदी मान्यवर उपस्थित होते



यावेळी वकृत्व,निबंध,पोष्टर व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करणेत आले होते त्याचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते झाले.

यावेळी किरण लाड म्हणाले हा देश स्वातंत्र करण्यासाठी हजारो स्वातंत्रसैनिकांनी आपले बलिदान दिले अन हजारो लोकांच्या बलिदानातून मिळालेले हे स्वातंत्र व लोकशाही टिकविण्याची जबाबदारी भारतातील प्रत्येक नागरीकाची असून युवा पिढीसह सर्व नागरीकांनी मतदान करणे गरजेचे आहे.

यावेळी क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण लाड,प्राचार्य डॉ.आर.एस डुबल,डॉ.प्रताप लाड,अभिजित सांडगे,मतदान केंद्रस्तरीय अधिकारी प्रशांत गायकवाड,श्रीकांत निकम,विजय माने,निखिल ऐवळे,महेश मदने,प्रकाश थोरबोले, प्रणव विभुते,प्रतापसिंग रजपूत उपस्थित होते सेवटी मतदार जनजागृती रॅलीने या अभियानाची सांगता झाली.या कार्यक्रमाचे संयोजन क्रांतीअग्रणी महाविद्यालय व पलुस तहसिल कार्यालयाच्यावतीने करणेत आले.

Daily Lalkar

दैनिक ललकार